# जग जोडा, शांतता अनुभवा, जीवन साजरे करा असा संदेश देत मुंबईतील दोन रोटेरियन्स व्यावसायिक प्रवीण मेहता आणि डॉक्टर सुधीर बलदोटा निघाले जगप्रवासाला

## ३०० दिवसांमध्ये ७०००० किलोमीटर प्रवास करत ४ उपखंडातील ६० देश पादाक्रांत करणार

मुंबई, गुरुवार : एक आगळा आणि अभूतपूर्व असा उपक्रम मुंबईतील व्यवसायिक श्री प्रवीण मेहता आणि त्यांचे मित्र डॉक्टर सुधीर बलदोटा यांनी हाती घेतला आहे. त्यांनी कारमधून साठ देशांच्या जागतिक प्रवासाला सांताक्रूझ येथील रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टच्या कार्यालयापासून ८ एप्रिल २०१९ रोजी सुरुवात केली असून ते आशिया, युरोप, दक्षिण अमेरिका आणि उत्तर अमेरिका या उपखंडांमधून प्रवास करत ३०० दिवसांमध्ये ७०००० किलोमीटर पूर्ण करणार आहेत. जग जोडा, शांतता अनुभवा, जीवन साजरे करा हा त्यांच्या या जगप्रवासामागील संदेश आहे.

या प्रवासादरम्यान हे दोघे विविध देशांमधील साधारण १२० मान्यवरांना भेटणार आहेत. या मान्यवरांमध्ये विविध क्षेत्रातील लोकप्रिय प्रतिष्ठितांचा समावेश असून या सर्वांनी समाजासाठी बहुमूल्य असे काम केले आहे. हे दोघे अशा लोकांना भेटणार आहेत की जे राजकारणी किंवा सेलिब्रिटी नाहीत तर ते विविध समाज स्तरांवर काम करणारे आणि इतरांसाठी प्रेरणा ठरणारे सर्वसामान्य आहेत. या मान्यवरांमध्ये शास्त्रज्ञ, संशोधक, कलाकार, सामाजिक व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते, रेडिओ जॉकी, लेखक, शिक्षक किंवा समाजामध्ये प्रगती घडवून आणणारी कोणतीही व्यक्ती यांचा समावेश असेल. रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टने या उपक्रमाला पाठबळ दिले असून ही एक परिवर्तनाच्या मार्गावरील यशोगाथा आहे असे त्याचे वर्णन केले आहे.




प्रवीण मेहता हे यशस्वी व्यावसायिक आहेत. त्यांच्या यशाच्या शिरपेचात अनेक तुरे खोवले गेले आहेत. त्यांनी चंदिगड ते स्पिती व्हॅली ते मनाली ते पुन्हा चंदिगड असे १००० किलोमीटरचे अंतर मोटर बाईकवरून पूर्ण केले आहे. चंदीगड ते लेह मनाली लेह आणि पुन्हा चंदिगड हे ११०० किमीचे अंतर तसेच मुंबई, कन्याकुमारी, चेन्नई, बेंगलोर ते पुन्हा मुंबई हे ४५०० किमीचे अंतर त्यांनी असेच पार केले होते. त्याचबरोबर त्यांनी अनेक कार रॅलींमध्येही सहभाग नोंदवला आहे. मुंबई ते गोवा (६६०किमी), तसेच मनाली ते लेह (५५० किमी) हे अंतर सायकलिंग करत त्यांनी पार केले आहे. त्यांनी अनेक बेस कॅम्पचे ट्रेकिंग केले असून त्यांत स्टोक कांगरी, जगतसुख पर्वत, थोरोंग-ला पास यांचा समावेश आहे. त्यांचे असे मानणे आहे की, त्यांच्या पश्चात त्यांच्या स्मृतिस्थळावर लिहिले जावे, इथे असा एक माणूस विसावला आहे, की जेव्हा तो जिवंत होता तेव्हा शांतताप्रिय होता.

डॉक्टर सुधीर यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प, अन्नपूर्णा बेस कॅम्प, स्टोक कांगरी आणि जगतसुख पर्वत असे अनेक पर्वतट्रेक केले आहेत. त्यांनी अनेक अर्धमॅरेथॉन पूर्ण केल्या आहेत. त्यांत मुंबई स्टँडर्ड चार्टर्ड मॅरेथॉन (२१ किमी), झुरीच मॅरेथॉन यांसारख्या अनेक मॅरेथॉन स्पर्धांचा समावेश आहे. त्यांनी खावो लाक स्पिकिंग येथे स्कुबा डायविंगही केले आहे. त्यांच्या या नवीन जगभ्रमण मोहिमेबद्दल बोलताना ते म्हणतात, एक होमिओपॅथिक डॉक्टर म्हणून मला अनेक रुग्णांना हाताळायची संधी मिळाली. त्याचाच परिणाम म्हणून मी नेहमी दृश्य संवादांमध्ये अधिकाधिक रस घेतला. कृष्णधवल व्यासपीठावर काम करताना आनंद मिळाला पण त्यानंतर डिजिटल फोटोग्राफी करून तो अधिक वृद्धिंगत झाला, असे ते म्हणतात.

दोन रोटेरियन्स हे साठहूनही अधिक देशांमध्ये भ्रमण करत तीस दिवसांत हा जगप्रवास पूर्ण करणार आहेत, याचा आम्हाला अतिशय आनंद होत आहे. रोटरी हे एक जागतिक जाळे असून या जाळ्यामध्ये अनेक प्रतिभासंपन्न लोक आहेत आणि जगात बदल घडवून आणण्याची मनीषा उरी बाळगतात. जागतिक परस्परसंबंध आणि शांतता या बाबींमध्ये रोटरी नेहमीच आघाडीवर राहिली आहे. यंदाची रोटरीची संकल्पना ही बी द इंस्पिरेशन ही आहे. पुढील वर्षासाठी घोषवाक्य हे रोटरी कनेक्ट्स द वर्ल्ड असे असेल. पुढील रोटरी वर्षाची सुरुवात जुलै २०१९ मध्ये होत आहे. प्रतिभासंपन्न वैचारिक स्पष्टता असलेले आणि उमदे लोक यांना एकत्र आणणे आणि त्याद्वारे हे जग सुंदर करण्यासाठी प्रयत्न करणे हे रोटरीच्या या प्रयत्नांमागील उद्दिष्ट आहे, असे उद्गार रोटरी क्लब ऑफ बॉम्बे वेस्टचे अध्यक्ष आनंद गुप्ता यांनी काढले.